RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक १३६] बुधवार, ऑक्टोबर ११, २०२३/आश्विन १९, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३७८**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १० ऑक्टोबर २०२३.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-व्हीआयपी-२०२३/प्र.क्र. १९१/म-१(धोरण).—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून काढलेल्या शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्र. मुद्रांक-२०१९/१०५९/प्र.क्र.२७०/म-१(धोरण), दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त आदेश" असा केला आहे) याद्वारे, लोकहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याबद्दल त्याची खात्री पटल्याने, मौजा बिनाकी, खसरा क्रमांक ५५ आणि मौजा नागपूर, खसरा क्रमांक १०८/१, १०८/२ (नगर भूमापन क्रमांक-१०१, शीट क्र.१०७), जिल्हा नागपूर येथे स्थित असलेल्या १३.८१ हेक्टर इतक्या जमिनीचे (यात यापुढे संयुक्तपणे जिचा निर्देश, "उक्त जमीन" असा केला आहे) मालक, श्री. नागनाथ बळवंत काळे व इतर (यात यापुढे संयुक्तपणे ज्यांचा निर्देश, "मालक" असा केला आहे) आणि बिनाकी गृहनिर्माण योजनेमधील बांगलादेश नामक झोपडपट्टीचे (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त झोपडपट्टी" असा केला आहे) रहिवासी किंवा भोगवटादार यांच्या दरम्यान, उक्त जमिनीवरील उक्त झोपडपट्टीमध्ये स्थित असलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या बाबतीत, निष्पादित केलेल्या अभिहस्तांतरणाच्या कोणत्याही संलेखांवर, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एकच्या अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अन्वये अन्यथा आकारणीयोग्य असलेल्या एकूण मुद्रांक शुल्काच्या ऐंशी टक्के इतके मुद्रांक शुल्क, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींची पूर्तता करण्यास अधीन राहून, माफ केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे, अभिहस्तांतरणाच्या कोणत्याही संलेखांवर, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एकच्या अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अन्वये अन्यथा आकारणीयोग्य असलेल्या एकूण मुद्रांक शुल्काच्या ऐंशी टक्के इतक्या माफी ऐवजी, रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) इतके मुद्रांक शुल्क निश्चित करण्यासाठी शासनाकडे विनंती करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे, अभिहस्तांतरणाच्या कोणत्याही संलेखांवर, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-१ च्या अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अन्वये अन्यथा आकारणीयोग्य असल्याप्रमाणे, रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) च्या मर्यादित मुद्रांक शुल्क कमी करणे व निश्चित करणे लोकहितार्थ इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनस वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, याद्वारे, उक्त आदेशामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त आदेशामध्ये,—

(अ) पहिल्या परिच्छेदामधील, "अन्यथा आकारणी योग्य असलेल्या एकूण मुद्रांक शुल्काच्या ८० टक्के इतके मुद्रांक शुल्क लोकहितार्थ, माफ करण्याचे ठरवले आहे" या मजकुराऐवजी, "अन्यथा आकारणीयोग्य असल्याप्रमाणे, रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त) च्या मर्यादित मुद्रांक शुल्क, लोकहितार्थ, कमी करण्याचे व निश्चित करण्याचे ठरविले आहे" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) दुसऱ्या परिच्छेदामधील, "अन्यथा आकारणी योग्य असलेल्या एकूण मुद्रांक शुल्काच्या ऐंशी टक्के इतके मुद्रांक शुल्क, पुढील शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, याद्वारे, माफ करीत आहे" या मजकुराऐवजी, "अन्यथा आकारणीयोग्य असल्याप्रमाणे, रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त) च्या मर्यादित मुद्रांक शुल्क, पुढील शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, याद्वारे, कमी करीत आहे व निश्चित करीत आहे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार व. जावळे,**
शासनाचे अवर सचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 10th October 2023.

*ORDER*

Maharashtra Stamp Act.

No. VIP-2023/C.R. No. 191/M-1(Dhoran).—Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Order, Revenue and Forests Department, No. Mudrank-2019/1059/C.R.No.270/M-1 (Dhoran), dated the 9th September 2019 (hereinafter referred to as "the said Order"), issued in exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), being satisfied that it is necessary so to do in the public interest, remitted eighty per cent. of the total stamp duty as otherwise chargeable under clause (*b*) of article 25 of Schedule-I appended to the said Act, on any instrument of conveyance executed between Mr. Nagnath Balwant Kale and others (hereinafter collectively referred to as "the owner"), the owner of the land admeasuring 13.81 hectare 2 located at Mouza- Binaki Kh.No.55 and Mouza-Nagpur, Kh.No.108/1, 108/2 (CTS No.101 Sheet No.107) District Nagpur (hereinafter collectively referred to as "the said land") in favour of any of the residents or occupants of the slum named as Bangladesh in Binaki Housing Scheme (hereinafter referred to as "the said slum") in respect of any property situated in the said slum on the said land, subject to fulfilment of the conditions specified therein ;

And whereas, a request has been made to the Government to fix the stamp duty as Rs. 1000 (Rupees One Thousand Only) instead of remitting eighty per cent. of the total stamp duty as otherwise chargeable under clause (*b*) of Article 25 of Schedule-I appended to the said Act, on any instrument of conveyance as stated in the said order ;

And Whereas, the Government Maharashtra considers it expedient in the Public interest, to reduce and fix the Stamp duty to the extent of Rs. 1000 (Rupees One Thousand Only) as otherwise chargeable under clause (*b*) of Article 25 of Schedule-I appended to the said Act, on any instrument of conveyance as stated in the said order.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the the Maharashtra Stamp Act (LX of 1958), the Government of Maharashtra hereby amends the said Order, as follows, namely :—

In the said Order,—

(*a*) in the first paragraph, for the words, "has decided to remit eighty per cent. of the total stamp duty as otherwise chargeable", the words, figures and letters, "has decided to reduce and fix the stamp duty to the extent of Rs. 1000 (Rupees One Thousand only) as otherwise chargeable" shall be substituted ;

(*b*) in the second paragraph, for the words, "remits eighty percent of the total stamp duty as otherwise chargeable", the words, figures and letters, "reduces and fixes the stamp duty to the extent of Rs. 1000 (Rupees One Thousand only) as otherwise chargeable" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR V. JAWALE,
Under Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.